**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई**

**एमएमटीसी हाऊस, ५ वा मजला**
**प्लॉट नं. सी २२, ब्लॉक - ई ,**
**वांद्रे कुर्ला संकुल,**
**वांद्रे (पुर्व),मुंबई ४०० ०५१.**

**संकेतस्थळ**– www.mahabocw.in
**दुरध्वनी व फॅक्सक्र.** ०२२-२६५७२६३१
**ई-मेल**- bocwwboardmaha@gmail.com

जा.क्र/१११५/२०२३/संप्रणा-२०२३/प्र.क्र.२/योजना-०२ दिनांक : 03 NOV 2023

**प्रति,**

१. अप्पर कामगार आयुक्त/कामगार उप आयुकत
कोकण/पुणे/नागपूर/अमरावती/नाशिक/छ. संभाजीनगर

२. कामगार उप आयुक्त/सहाय्यक कामगार आयुक्त/जिल्हा कामगार अधिकारी/
जिल्हा कामगार सुविधा केंद्र (सर्व)

**विषय** :- एकात्मिक कल्याणकारी मंडळ संगणकीय प्रणाली (IWBMS) वर प्राप्त होणाऱ्या बांधकाम कामगारांच्या नोंदणी/नूतणीकरण/लाभ वाटप अर्जावर करावयाच्या कार्यवाहीवर सर्वकष सूचना देणेबाबत.

**संदर्भ** :- १.मंडळाचे पत्र क्र.१८८५/२०२३/संप्रणा-२०२३/प्र.क्र.१/योजना-०२, दि. २०.१०.२०२३.

उपरोक्त संदर्भिय विषयान्वे मंडळाच्या दि. २०.१०.२०२३ रोजीच्या पत्रान्वये सर्व जिल्हा कामगार सुविधा केंद्रात राबविण्यात येणाऱ्या नोंदणी/नूतणीकरण/लाभ वाटप करावयाच्या कार्यवाहीबाबत सर्वकष सूचना देण्यात आलेल्या आहेत. याबाबत अतिरिक्त सूचना खालीलप्रमाणे-

१. सर्व जिल्हा कार्यालयाअंतर्गत अर्ज दि. ३०.११.२०२३ अखेर निकाली काढावयाचे असल्याने काही जिल्ह्यात प्रलंबित अर्जाची संख्या विचारात घेऊन अतिरिक्त लाभ वाटप लिपिक लॉग-ईन आय.डी. निर्माण करून देण्यात आलेले आहेत.

२. लाभ वाटप लिपिक लॉग-ईन आय.डीवर प्राप्त झालेले लाभाचे अर्ज दि. ३०.११.२०२३ अखेर निकाली काढावयाचे असल्याने संबंधित कर्मचाऱ्यांना या कामाव्यतिरिक्त इतर कोणतेही कामकाज देण्यात येऊ नये.

३. सध्यस्थितीत नोंदणी अधिकाऱ्यांना तालुकानिहाय लॉग-ईन आय.डी वितरित करण्यात आल्याने दि.२०.१०.२०२३ पूर्वी प्राप्त प्रलंबित सर्व रक्कमेच्या लाभाचे अर्ज मंडळाच्या यापूर्वीच्या सूचनेनूसार नोंदणी अधिकाऱ्यांमार्फत निकाली काढण्यात यावेत.

४. ज्या जिल्हा कार्यालयात अतिरिक्त कर्मचारी उपलब्ध करून देण्यात आलेले आहेत त्यासाठी लागणारे संगणक व यंत्र सामग्रीकरिता लागणारा खर्च विहित कार्यपध्दतीचा अवलंब करून प्रशासकीय निधीतून करण्यात यावा.

५. मंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजनेचे सर्व अर्ज नोंदणी अधिकारी म्हणून नियुक्त करण्यात आलेल्या अधिकारी कर्मचारी यांच्यामार्फत निकाली काढण्यात यावे.

६. लिपिक लॉगिन आयडीवर प्रलंबित असलेले सर्व अर्ज दि. ३०.११.२०२३ अखेर निपटारा न झाल्यास प्रलंबित सर्व अर्ज संगणक प्रणालीमार्फत थेट रद्द होतील व त्याबाबतची सर्वस्वी जबाबदारी संबंधित जिल्हा कार्यालयाची असेल याची नोंद घेण्यात यावी.

(विवेक कुंभार)
सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार
कल्याणकारी मंडळ, मुंबई